


मराठी साप्ताहिक

# निसर्ग चक्र

संपादक: शिवम राजेंद्र वखरे

■ कार्यकारी संपादिका
सौ. सिमा राजेंद्र वखरे

■ Postal Regd.No. THC/262/2023-2025
■ RNI.No. MAHMAR/2022/83338
■ E Mail : nisargchakra2001@gmail.com

■ वर्ष : ०२
■ अंक : ४२
■ पाने : ४
■ कल्याण, जि. ठाणे
■ मंगळवार, दि. २३ एप्रिल ते २९ एप्रिल २०२४
■ मूल्य : रु ५.००/-
■ आर. एन. आय.नं. एमएएचएमएआर/२०२२/८३३३८

■ Vol : 02 ■ Issue : 42 ■ Marathi Weekly ■ Pages : 4 ■ Kalyan, Dist Thane ■ Tuesday, Date : 23 April To 29 April 2024 ■ Price 5.00 /-


# डॉ .श्रीकांत शिंदे यांचा कार्य अहवाल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते डोंबिवलीत प्रकाशन संपन्न

डोंबिवली :- (निसर्ग चक्र टीम ) : - कल्याण लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या कारकीर्द कार्य अहवालाचे डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले नाट्य मंदिरात रविवारी संध्याकाळी सहा वाजता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन सोहळा संपन्न झाला

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर श्रीकांत लता एकनाथ शिंदे यांनी गेल्या दहा वर्षाच्या काळात त्यांच्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत .या सर्व विकास कामाचा लेखाजोखा विकास दशक दहा वर्ष प्रगतीची कल्याणच्या समृद्धीची. या कार्य अहवाल प्रकाशन सोहळ्याचे आयोजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्य उपस्थितीत रविवारी २१ एप्रिल २०२४ रोजी डोंबिवली मधील सावित्रीबाई फुले नाट्यगृहात सायंकाळी सहा वाजता हा सोहळा पार पडला. या सोहळ्याला मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण तसेच स्थानिक भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई सर्व घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते .

गेल्या दहा वर्षाच्या कालखंडात कल्याण लोकसभा मतदारसंघात अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास गेले आहेत, तर अनेक विकास कामे प्रगतीपथावर आहेत. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मतदार संघातील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान करण्यासाठी, विविध शहरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, कल्याण शिळफाटा रस्त्याचे सहा पदरीकरण ,ऐरोली काटई फ्री वे काटई अंबरनाथ रस्त्याचे काँक्रिटीकरण ,कल्याण रिंग रोड या महत्त्वाच्या मार्गाची उभारणी करण्यात आली आहे ,तर वाहन चालकांच्या वेळेची बचत व्हावी यासाठी मोठा गाव मानकोली उड्डाणपूल कोपरगाव रेल्वे उड्डाणपूल ,शीळफाटा सहा पदरी उड्डाणपूल, पलावा उड्डाणपूल या महत्त्वाच्या उड्डाणपूलांची उभारणी झाली आहे . तर विठ्ठलवाडी कल्याण उन्नत मार्ग ,महामार्ग रिंग रोड ,कल्याण फाटा उड्डाणपूल यासारखी अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प प्रस्तावित आहेत तर मतदार संघातील वाहतुकीचा चेहरा मोहरा बदलून टाकणाऱ्या कल्याण तळोजा मेट्रो पायाभरणी झाली असून येत्या दोन वर्षात मेट्रो नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे.

याचबरोबर आरोग्य क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी उल्हासनगर येथे मोफत रुग्णालय, कामगार रुग्णालयाची उभारणे, डोंबिवली येथे कॅन्सर आणि प्रसूती रुग्णालय अंबरनाथ येथे अत्याधुनिक रुग्णालय ,कल्याण डोंबिवली तसेच कळवा येथे विविध आरोग्य सुविधा उभारण्यात आले आहेत तर लवकरच अंबरनाथ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे राहणार आहेत याचबरोबर खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने मतदारसंघात क्रीडा क्षेत्रात विविध सुविधांची उभारणी करण्यात आली आहे तसेच अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक भावनांचे देखील उभारणी झाली आहे .

खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षाच्या कालखंडात अशा सर्वांना विकसित झालेल्या या मतदारसंघातील विकास कामाचा सविस्तर आढावा विकास दशक दहा वर्ष प्रगतीची कल्याणच्या समृद्धीची या कार्य अहवालातून घेण्यात आला आहे.



खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे हे विजयाची हॅट्रिक करतील यात शंकाच नाही असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण लोकसभेचे उमेदवार डॉक्टर श्रीकांत शिंदे हे पुन्हा एकदा डोंबिवलीत आयोजित कार्यक्रमात अधोरेखित केले. डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना जनतेने गेल्या दहा वर्षांपासूनच आपला खासदार निवडला असून यावेळेस मोठ्या मताधिक्याने ते निवडून येतील प्रत्येकाचे मतदान हे खासदाराच्या वतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना असेल असे ते म्हणाले.

कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत मतदारसंघात केलेल्या विकास कामांचा सविस्तर लेखाजोखा असलेल्या

### श्रीकांत डॉक्टर पण मी अनेकांच्या सर्जरी केल्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा घणाघात

विकास दशक, दहा वर्षे प्रगतीची, कल्याणच्या समृद्धीची या कार्य अहवालाचा प्रकाशन सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते डोंबिवलीत पार पडला.

यावेळी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे ,सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण ,आमदार राजु पाटील ,प्रमोद हींदूराव, जगन्नाथ शिंदे ,राजेश मोरे या सह स्थानिक भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई सर्व घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते .याप्रसंगी भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यादेखील उपस्थित होत्या. मान्यवरांच्या रांगेत त्यांना बसविण्यात आले होते . मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. श्रीकांत डॉक्टर आहे मी डॉक्टर नसलो तरी मी काही सर्जऱ्या केल्या आहेत काही लोकांचे पट्टे गायब झाले पटापट काही लोक फास्ट चालायला लागले ते देखील गरजेचे होते असा टोमणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला. अहंकारी लोक आपल्या इगो साठी राज्याचे नुकसान करताना आपण पाहिले आहेत . शेवटी सहकार्य ,योगदान मागायचं असतं केंद्राकडून मदत मागणं किंवा **उर्वरीत पान नं.३वर...**

## कल्याण डोंबिवलीत रस्त्यावर अनाधिकृत स्पीडब्रेकर

डोंबिवली :- (निसर्ग चक्र टीम ) : - कल्याण डोंबिवली मधील काही ठिकाणी रस्त्याची चाळण झालेली आपणास पहावयास मिळत असून दुसरीकडे सिमेंटचे रस्तेही बनवणे सुरू आहे, परंतु कल्याण डोंबिवलीमध्ये गेल्या कित्येक वर्षापासून अनाधिकृत स्पीड ब्रेकर बसवण्यात आलेले आहेत .यासाठी स्पीड ब्रेकर टाकताना परवानगी घेण्यात आली होती का? हा मात्र संशोधनाचा विषय ठरेल . आताही ज्या ज्या ठिकाणी सिमेंट काँग्रिटचे रस्ते सुरू आहेत .त्या ठिकाणी सुद्धा अनधिकृत स्पीडब्रेकर बसवले आहे. त्यामुळे अनेकदा अपघात घडतात विशेष म्हणजे या स्पीड ब्रेकरवर कुठल्याही प्रकारची रंगरंगोटी करण्यात आली नसल्यामुळे वाहनचालकांच्या ते लक्षात येत नाही म्हणून तात्काळ कल्याण डोंबिवली मधील अनाधिकृत असलेले स्पीडब्रेकर काढण्यात यावे अशी नागरिकांमधून मागणी होत आहे.

## वालधुनी नदी परिसरातील तीन हजार कुटुंबीयांचा लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार

कल्याण :- (निसर्ग चक्र टीम ) : -
कल्याण येथील वालधुनी नदी पात्रात मागील दोन महिन्यांपासून मातीचे भराव टाकून बांधकामे उभी केली जात आहेत. या बांधकामांमुळे पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह अडून वालधुनी नदीचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरून रहिवाशांची दैना होणार आहे.

कल्याण मधील विठ्ठलवाडी, शहाड भागातून वाहत असलेल्या वालधुनी नदी पात्रात मागील दोन महिन्यांपासून मातीचे भराव टाकून बांधकामे उभी केली जात आहेत. या बांधकामांमुळे पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह अडून वालधुनी नदीचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरून रहिवाशांची दैना होणार आहे. हे माहिती असुनही कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन, महसूल विभाग कोणतीही कारवाई करत नसल्याच्या निषेधार्थ वालधुनी नदी काठ भागातील तीन हजार कुटुंबीयांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

वालधुनी नदी बचाव रहिवासी संघर्ष समितीने हा निर्णय घेतला आहे. दरवर्षी पावसाळ्यात मुसळधार पाऊस पडला की वालधुनी नदीचे पाणी विठ्ठलवाडी, शहाड भागातील नदी काठच्या झोपड्या, गृहसंकुलांमध्ये शिरते. दरवर्षी कल्याण डोंबिवली पालिकेला या भागातील पाण्याचा निचरा करताना कसरत करावी लागते. हे माहिती असुनही कल्याण डोंबिवली पालिकेने विठ्ठलवाडी पूर्व भागात वालधुनी नदी काठी बांधा, वापरा, हस्तांतरित करा तत्वावर एक बांधकाम प्रकल्प एका विकासकाला विकसित करण्यासाठी दिला आहे. या बांधकामासाठी नदीमधील अर्धा भाग मातीचा भराव टाकून बुजविण्यात आला आहे. या भरावामुळे नदीचा प्रवाह अरूंद झाल्याने पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थिती नसताना नदीचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये घुसून रहिवाशांना बेघर होण्याची वेळ येणार आहे, असे वालधुनी नदी बचाव रहिवासी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.




यासंदर्भात पालिका आयुक्तांपासून सर्व अधिकाऱ्यांना सांगुनही कोणीही संघर्ष समितीच्या तक्रारींची दखल घेत नाही. या भागातील रहिवाशांना जलमय करण्याचा आणि बेघर करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. त्याचा निषेध म्हणून या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय समितीने घेतला आहे, असे समिती पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

नदी पात्रातील बांधकामाच्या विरोधात आंदोलन आणि त्यानंतर बेमुदत साखळी उपोषण सुरू केले जाणार आहे, असा इशारा समितीने दिला आहे. पालिका अधिकारी मात्र या विषयावर मौन बाळगून आहेत.

वालधुनी नदी पात्रातील बांधकाम कल्याण डोंबिवली पालिकेकडून थांबविली जात नाही तोपर्यंत आताच्या लोकसभा निवडणुकीपासून ते येणाऱ्या विधानसभा, पालिका निवडणुकीवरही वालधुनी नदी परिसरातील साईनगर भागातील रहिवासी बहिष्कार टाकतील, असा इशारा वालधुनी नदी बचाव रहिवासी संघर्ष समितीने वालधुनी नदी भागात साईनगर भागाच्या प्रवेशद्वारावर एका फलकाव्दारे दिला आहे. कल्याण परिसरात मतदान टक्का वाढविण्यासाठी शासन यंत्रणेकडून जोरदार प्रयत्न सुरू असताना या बहिष्काराच्या अस्त्रावर प्रशासन काय निर्णय घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावरही करण्यात आली मतदानाबाबत जनजागृती !

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत कल्याण लोकसभा -२४ या मतदारसंघात मतदार जनजागृती साठी अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे ,याच अनुषंगाने आज १४२- कल्याण पूर्व स्वीप पथकातील महापालिकेचे शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी (स्वीप)



यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण पूर्व येथील, चक्की नाका परिसरातील ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावर उपस्थित जेष्ठ नागरिकांसमवेत मतदान जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला आणि त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

जे जेष्ठ नागरिक- मतदार हे ८५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे आहेत आणि त्यांनी १२- हा अर्ज भरून दिला असेल तर असा अर्ज प्राप्त झालेल्या निवडणूक कार्यालयातील मतदान अधिकारी, संबंधित जेष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन त्यांचे टपाली मतदान स्वीकारणार आहेत; याबाबत उपस्थित जेष्ठ नागरिकांना माहिती देण्यात आली आणि उपस्थितांसमवेत मतदानाची शपथ घेऊन त्यांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले.

# सावधान...! भारतीय लोकशाहीत पेड न्यूजला थारा नाही!

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने दि.१६ मार्च २०२४ आदर्श आचार संहिता जाहीर केली आहे. लोकसभेत योग्य, कार्यक्षम व लोकाभिमुख दृष्टिकोन असलेला लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी प्रत्येक भारतीय मतदाराने मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येते. मतदान करणे, हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याने मतदारांनी कुठल्याही आमिषाला वा प्रलोभनाला बळी पडू नये. तसेच धाकदपटशाहीला भीक न घालता मतदारांनी सद्सद्विवेकबुद्धीने मतदान करावे. महत्वाचे म्हणजे निवडणुका मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पडाव्यात, यासाठी सर्वपक्षीय उमेदवारांनी अन्प्रसारमाध्यमांनी सहकार्य करावे, असे निवडणूक आयोगाकडून आवाहन करण्यात आले आहे.

मागील काही सार्वत्रिक निवडणुकींचे सिंहावलोकन केल्यावर देशात काही ठिकाणी पेड न्यूज च्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. खरे तर, अशा घटना लोकशाहीला मारक आहेत. त्याचप्रमाणे पेड न्यूज हे मुक्त व शोधपत्रकारितेलाही बाधक आहे. यास्तव वृत्तपत्रे अन्त्यांच्या प्रतिनिधींनी ठपेड न्यूजठ ला अजिबात थारा देऊ नये. सर्वात महत्वाचे म्हणजे सुदृढ लोकशाहीसाठी उमेदवारांनीदेखील आपल्या प्रचार मोहिमेदरम्यान पेड न्यूजचा आधार घेवू नये. कारण पेड न्यूज हा लोकशाही संवर्धनाच्या मार्गातील मोठा अडसर आहे, हे लक्षात द्यावे.

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पेड न्यूजसंदर्भात केलेली व्याख्या ठएखाद्या उमेदवाराने पैशाच्या मोबदल्यात किंवा विशेष मेहरनजरेच्या बदल्यात प्रसिद्धी माध्यमाद्वारे केलेली बातमी, वृत्तांकन, विश्लेषण वा प्रसारणठ अशी आहे. असे कृत्य केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्या संबंधीत प्रसारमाध्यम, वृत्तपत्र आणि उमेदवाराच्या लोकप्रियतेला तडा जावून जनमानसातील विश्वासाहर्ता नाहीशी होत असते. म्हणजेच एखाद्या उमेदवाराने, राजकीय पक्षाने वा त्याच्या संघटना किंवा संस्थेने मतदारांना प्रभावित करण्याच्या हेतूने वर्तमानपत्रे, सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया ( विभिन्न चॅनल्स) यांच्याद्वारे सोयीनुसार बातम्या प्रसिद्ध-प्रसारित करणे, हे सर्व प्रकारे पेड न्यूजच्या कक्षेत येतात, हे उमेदवार व माध्यमांनी जरूर लक्षात घ्यावे.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे वृत्तांकनाच्या (दृकश्राव्य) बदल्यात घेतलेला पैसा वा भेटवस्तू याला ठभ्रष्टाचाराचे कृत्यठ म्हणून घोषित केल्याने, तो आता शिक्षापात्र अपराध आहे. म्हणूनच पेड न्यूजसारख्या गैरप्रकारांना प्रसारमाध्यमांनी स्वत:हूनच मज्जाव करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

उमेदवारांनी प्रचार मोहिमेत केलेल्या खर्चाचा अचूक लेखा ठेवून, त्याचे विवरणपत्र संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे तसेच खर्च नियंत्रण समितीच्या नोडल अधिकाऱ्यांकडे सादर करणे, निवडणूक आयोगाने अनिवार्य केले आहे. त्यात कसूर करणे हाही एक अपराधच आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे तर ठपेड न्यूजठ हा निकोप पत्रकारितेची संभाव्य कीड आहे. यासाठी पत्रकारांनीच पुढाकार घेवून ठपेड न्यूजठ या अनैतिक बाबीला अस्वीकृत करून हद्दपार करायला हवे. वृत्तपत्रे व दूरचित्रवाहिन्यांनी पत्रकारितेची मूल्ये शिरसावंद्य मानून, लोकशाहीची बूज राखायला हवी. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी हे लोकशाहीचे पाईक असल्याने, त्यांनी पत्रकारिता क्षेत्रातून पेडन्यूजला हद्दपार करण्यास कटिबद्ध व्हावे. घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटना अन्भारतीय लोकशाहीचा जगाच्या पाठीवर सर्वत्र नावलौकिक आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील सर्वपक्षीय उमेदवार, त्यांचे पदाधिकारी आणि प्रसारमाध्यमे (प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमे) या सर्वांनी योग्य ती खबरदारी घेऊन लोकशाहीला मारक असलेल्या पेड न्यूजचा मार्ग अवलंबू नये, असे कळकळीचे आवाहन करण्यात येत आहे. आपण अशा प्रकारे कर्तव्यपूर्ती केल्यामुळे भारतीय लोकशाही जागतिक स्तरावर सदैव आदर्श लोकशाही म्हणून गणली जाईल, हे निश्चित!

मनोज सुमन शिवाजी सानप

जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे तथा नोडल अधिकारी, एकत्रित मीडिया कक्ष आणि सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, ठाणे

# संपादकीय...

**दिवसभरातून एकदा तरी स्वत:शी संवाद साधा नाहीतर तुम्ही जगातील एका चांगल्या व्यक्तीला भेटण्याची संधी गमवाल!**

## संविधानभान : समाजातले मडिफॉल्ट सेटिंगफ

**समाजात प्रत्येकाच्या भिन्न स्थानाचा विचार करून आरक्षण असो किंवा विशेष सवलती यांबाबत धोरणे आखावी लागतात**

**-डॉ. श्रीरंजन आवटे**

समाजात प्रत्येकाच्या भिन्न स्थानाचा विचार करून आरक्षण असो किंवा विशेष सवलती यांबाबत धोरणे आखावी लागतात..

इंद्रा साहनी खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के ही आरक्षणाची मर्यादा घालून दिली. व्यक्तींना कमी-जास्त प्रमाणात फायदे मिळतात किंवा तोटे होतात. त्याची सरळसोट उतरंड नाही. उदाहरणार्थ, उच्चजातीय स्त्रीला जातीमुळे काही फायदा होऊ शकतो; पण त्याच वेळी स्त्री असण्यामुळे अन्यायाला सामोरे जावे लागते. अग्



योगायोग असा की, सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी राजर्षि शाहू महाराजांनी समाजातील वंचित घटकांसाठी ५० टक्के आरक्षणाची तरतूद केलेली होती. 'आरक्षणाचे जनक' म्हणून राजर्षि शाहू महाराजांना ओळखले जाते, ते त्यांच्या द्रष्ट्या निर्णयांमुळे; पण मुळात आरक्षणाची गरज भासते कशामुळे? कारण प्रत्येकाचे समाजातील स्थान वेगवेगळे आहे.

आपल्याला या स्थानानुसार काही लाभ मिळत असतात. उदाहरणार्थ, प्रत्येक पुरुषाला पितृसत्ताक व्यवस्थेचा लाभांश मिळतो. त्याचप्रमाणे प्रत्येक उच्चजातीय व्यक्ती कनिष्ठ जातींवर जाणूनबुजून अन्याय करते असे नाही; पण समाजातल्या उच्च स्थानामुळे तिला काही लाभ मिळतात. तिला अधिक प्रतिष्ठा मिळते. एखाद्या देशात विशिष्ट धर्मीय बहुसंख्य असतील तर त्या समूहाचा भाग असण्यातून काही विशेषाधिकार प्राप्त होतात. साधारणपणे भिन्निलगी आकर्षण 'नॉर्मल' आहे, असे मानले जाते. त्यामुळेच समलिंगी किंवा पारिलगी व्यक्तीला वगळले जाते किंवा तिच्यावर अन्याय होतो. अशा वेळी भिन्निलगी आकर्षणाचा लैंगिक कल असणे ही बाबही विशेष अधिकाराची असते. तसेच पालक उच्चशिक्षित असतील तर पाल्याला त्याचा लाभ मिळतो.

आधीच्या किती पिढया शिक्षित आहेत, याचा लाभांशही पाल्याला मिळतो. पालकांना इंग्रजीसारख्या भाषेत गती असेल तर पाल्यांना त्याचा फायदा होतो. पालक श्रीमंत असतील तर शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत बाबींवर अधिक खर्च करू शकतात. तसेच व्यक्ती जिथे राहते तर पाल्यांना त्याचा फायदा होतो. पालक श्रीमंत असतील तर शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत बाबींवर अधिक खर्च करू शकतात. तसेच व्यक्ती जिथे राहते तिथे ऑनलाइन सुविधा उपलब्ध असण्याचाही लाभ मिळतो. शहरात राहणाऱ्या व्यक्तीला ग्रामीण भागात राहणाऱ्या व्यक्तींहून अधिक संधी मिळतात. असे अनेक घटक आहेत, ज्याच्या आधारे ादी तसेच आदिवासी पुरुषाला त्याच्या आदिवासी ओळखीमुळे अन्याय सहन करावा लागू शकतो; मात्र पुरुष असण्याचे काही फायदे त्याला मिळत असतात. उदाहरणार्थ, आई-वडील उच्चशिक्षित, श्रीमंत असलेल्या हिंदू-ब्राह्मण मुलाला सर्वाधिक विशेषाधिकार आहेत तर भटक्या विमुक्त जमातीमधील गरीब मुलीला तिच्या जन्मजात ओळखीमुळे कोणतेच विशेषाधिकार नाहीत. असे वेगवेगळे विशेषाधिकार असतात.

असे अनेक विशेषाधिकार आपल्याला असतील तर त्याविषयी गर्व असण्याचे कारण नाही किंवा विशेषाधिकार नसतील तर त्याची लाज बाळगण्याचेही कारण नाही; कारण या साऱ्या बाबी जन्माधारित ओळखीवर आधारित आहेत.

आपण आपली जात, धर्म, लिंग, पालक, त्यांची परिस्थिती ठरवू शकत नाही. ती परिस्थिती आपल्याला मिळते. कॉम्प्युटरमध्ये किंवा मोबाइलमध्ये जसे 'डिफॉल्ट सेटिंग' असते तसे हे आपल्या जन्मजात ओळखीला चिकटलेले डिफॉल्ट सेटिंग आहे. त्यात आपले कर्तृत्व नाही.

पिअरे बोर्द्यु या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने 'सांस्कृतिक भांडवल' ही संकल्पना मांडली. त्याच्या मते, व्यक्तीला मिळालेली परिस्थिती ही समाजमान्य संस्कृतीशी किती मिळतीजुळती आहे, यानुसार काही लाभ व्यक्तीला मिळतात. साहित्य, कला, शिक्षण, संस्कृती यांसारख्या माध्यमातून व्यक्तीला काही प्रमाणात भांडवल मिळते. त्यातून तिच्यासाठी प्रगतीच्या अधिक संधी मिळतात. यातल्या प्रत्येक निकषाच्या आधारे असणाऱ्या विशेषाधिकाराला उत्तर देता येतेच असे नाही. मात्र समाजात प्रत्येकाच्या भिन्न स्थानाचा विचार करून आरक्षण असो किंवा विशेष सवलती यांबाबत धोरणे आखावी लागतात.

भारतीय संविधानातील तरतुदीही दर्जाची व संधीची समानता मिळावी, हा विचार करून आखल्या आहेत, याची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे.

# सियाचीनचा सांगावा..

**भारताने कोणता भूभाग गमावला किंवा जिंकला हा विषय राजकीय मुद्दा बनवण्याची प्रवृत्ती आजची नव्हे. परंतु विद्यमान राजकीय संस्कृतीमध्ये यास अधिक धार आणि काही वेळा विखार प्राप्त झाला आहे हे मात्र नक्की.**

आतापर्यंत सर्वाधिक काळ राज्य केलेल्या काँग्रेसच्या नेत्यांवर तर, भूभाग किती वेळा गमावले हे ऐकून घेण्याची वेळच अधिकदा येते. या साठमारीत काँग्रेसच्याच अमदानीत एक विलक्षण मोहीम फत्ते झाली याविषयी पाठ थोपटून घेण्याची संधी साधण्याची राजकीय कल्पकता किंवा इच्छाशक्ती या पक्षाच्या सध्याच्या नेत्यांमध्ये अजिबात दिसून येत नाही. अन्यथा आज,१३ एप्रिल रोजी ४० वर्षे होत असलेल्या 'ऑपरेशन मेघदूत' या सियाचीन दिग्विजय मोहिमेचे श्रेय राजकीय स्वार्थासाठी तरी घेण्याचा विचार झाला असता. त्याऐवजी भारत-श्रीलंका दरम्यान एका निर्मनुष्य बेटाच्या मालकीबाबत खुलासे करण्यात काँग्रेस नेतृत्व वेळ व्यतीत करत आहे. त्यांनी तसेच करावे याविषयी सत्ताधाऱ्यांनी फेकलेल्या जाळ्यात हे नेते सपशेल अडकत गेले आणि अद्यापही स्वत:ला सोडवून घेण्याचा केविलवाणा खटाटोप करत आहेत. १९४७-४८, १९६२, काही प्रमाणात १९६५ ही सर्व युद्धे व मोहिमांमध्ये काँग्रेसचे कचखाऊ नेतृत्व दिसून आले, असे ठसवणाऱ्यांची आज सत्ता आहे आणि तसे मानणाऱ्यांची चलती आहे. १९७१चे युद्ध हा(च) काय तो अपवाद. पण त्या विजयालाही 'घर में घूस के मारा'ची खुमारी कुठे? त्यामुळेच ४० वर्षांपूर्वी, सहा हजार मीटर उंचीवरील अतिदुर्गम, अतिप्रतिकूल आणि म्हणून निर्मनुष्य अशा सियाचीन हिमनदी परिसरात, पाकिस्तानी हालचालींची खबरबात लागताच तत्परतेने सैन्य व सामग्रीची जमवाजमव करून, राष्ट्रीय नेतृत्वाच्या संमतीने आणि काही वेळा मार्गदर्शनाने घडवून आणलेल्या 'ऑपरेशन मेघदूत'विषयी बहुधा विद्यमान काँग्रेस नेते अनभिज्ञ असावेत. आणि तो काळ म्हणजे कचखाऊ नेतृत्वपर्व असल्याचे धरून चालल्यामुळे भाजप नेतृत्वाला या मोहिमेचे सामरिक महत्त्वच उमगले नसावे. आज ७६ किलोमीटर लांबीच्या सियाचीन हिमनदी परिसरावर भारताचे नियंत्रण असून, प्रामुख्याने पाकिस्तान आणि काही प्रमाणात चीनवर 'नजर" ठेवण्यासाठी अत्यंत सोयीच्या व उपयुक्त ठिकाणी भारतीय फौजा तैनात आहेत. हे ज्या मोहिमेमुळे शक्य झाले, तिची दखल घेणे आज समयोचित ठरते. पाकिस्तान आणि चीन ही दोन शत्रुतुल्य राष्ट्रे भारताच्या वायव्य, उत्तर आणि ईशान्य दिशेला, अर्धवर्तुळाकार विशाल टापूमध्ये वसलेली आहेत. भारतीय भूभागांवर स्वामित्व सांगणे व तसा प्रयत्न करणे हा तेथील प्राधान्याने लोकशाहीविरोधी सरकारांचा आवडता उद्योग.

**–संकलन–**
**राजेंद्र श्रावण वखरे**
**(वृत्त संपादक)**
**निसर्ग चक्र**



त्यामुळे त्यांच्याकडून होणारी घुसखोरी आणि आक्रमणे यांच्या सावटाखाली या देशातील सरकारांना राहावेच लागते. बहुतेक सीमावर्ती भाग हिमालयाच्या सान्निध्यातला, संपूर्ण काळ किंवा बहुतेक काळ हिमाच्छादित आणि तीव्र उंचीवर असल्यामुळे त्या भागात सीमांचे रक्षण करणे आणि घुसखोरीवर नजर ठेवणे हे अत्यंत आव्हानात्मक ठरते. स्वातंत्र्योत्तर पहिल्या भारत-पाकिस्तान संघर्षानंतर दोन वर्षांनी म्हणजे जुलै १९४९ मध्ये दोन्ही देशांमध्ये कराची युद्धविराम करार झाला, त्या करारात दोन्ही देशांदरम्यान तात्पुरती युद्धविराम सीमा ठरवण्यात आली. लडाखच्या उत्तरेस सियाचीन हिमनदीच्या पायथ्याशी 'एनजे ९८०४२०" या बिंदूपर्यंत ही सीमा निर्धारित करण्यात आली. त्यापुढील भूभाग अत्यंत दुर्गम आणि निर्मनुष्य असल्यामुळे 'ही सीमा येथून पुढे उत्तरेपर्यंत असेल. तिचे आरेखन दोन्ही देशांचे कमांडर संयुक्त राष्ट्रांच्या देखरेखीखाली करतील" असे ठरवून हा मुद्दा सोडून देण्यात आला. त्यापुढील भागावर स्वामित्व कोणाचे, याविषयीची संदिग्धता कायम राहिली, ती अगदी १९७१ मधील सिमला करारानंतरही. भारताने पाकिस्तानला नमवल्यानंतरच्या त्या करारात प्रत्यक्ष ताबारेषा अस्तित्वात आली, पण ती 'एनजे ९८०४२०' या बिंदूपाशी थबकली. या वेळी मसुद्यात थोडाफार बदल झाला तरी संबंधित बिंदूच्या पलीकडे, सियाचीन हिमनदीपासून ते काराकोरम पर्वतराजीपर्यंतच्या टापूवर नियंत्रण कोणाचे याविषयी त्याही करारात स्पष्ट उल्लेख नव्हता.

या संदिग्धतेचा फायदा उठवण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून सुरुवातीस झाला. या भागात मोठ्या प्रमाणावर गिर्यारोहण मोहिमा राबवण्यात आल्या, त्यासाठी परदेशी पर्यटकांना बोलावण्यात आले. अमेरिकेशी पाकिस्तानची त्या काळात घनिष्ठ मैत्री. त्यामुळे अमेरिकी नकाशे विभागाने प्रसृत केलेल्या नकाशांमध्ये सियाचीनचा अनारेखित टापू पाकिस्तानचा भाग म्हणून दाखवला जाऊ लागला. याची दखल घेऊन भारतीय बाजूकडूनही सियाचीन भागात गिर्यारोहण मोहिमा राबवल्या गेल्या, परंतु त्या प्रामुख्याने भारतीय लष्कराने राबवल्या. काही महत्त्वाच्या शिखरांवर बस्तान बसवल्यास, सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवता येईल आणि सामरिक वरचष्मा प्रस्थापित करता येईल, हे भारताच्या लष्करी नेतृत्वाने हेरले.तरी प्रत्यक्ष मोहिमेसाठी तात्कालिक कारण घडले. खलिस्तान चळवळीचा बीमोड करण्यात भारतातील राजकीय आणि लष्करी नेतृत्व व्यग्र असताना, तिकडे पाकिस्तानात लष्करशहा जनरल झिया उल हक यांनी डिसेंबर १९८३ मध्ये एका बैठकीत, स्वत:च्या प्रतिमासंवर्धनासाठी सियाचीनवर कब्जा करण्याच्या मोहिमेस संमती दिली. या मोहिमेचे नेतृत्व होते, भविष्यात पाकिस्तानचे लष्करशहा बनलेले पण त्या वेळी ब्रिगेडियर असलेले परवेझ मुशर्रफ यांच्याकडे. या मोहिमेची खबर भारतीय गुप्तहेरांनी आपल्या लष्करापर्यंत पोहोचवली. पाकिस्तानची मोहीम मे १९८४ मध्ये सुरू होणार होती. या काळात या भागातील बर्फ वितळण्यास सुरुवात होते. पाकिस्तानला गाफील पकडायचे, तर त्यांच्याआधी मोहीम आखून ती फत्ते करणे आवश्यक होते. यात जोखीम होती. निसर्गप्रपातामध्येच मोठ्या मनुष्यहानीची भीती होती. पण तो धोका पत्करण्याची मानसिक तयारी लष्करी अधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखवली. तत्कालीन पतप्रधान इंदिरा गांधी यांनी जातीने लक्ष घालून, थंडी आणि हिमदंश-रोधक पोशाख तसेच इतर सामग्री युरोपातून भारताला त्वरेने मिळेल हे सुनिश्चित केले. अत्यंत प्रतिकूल हवामानामध्ये हिमनदी परिसरातील मोक्याच्या भूभागांमध्ये जवान उतरवण्याशिवाय पर्याय नव्हता. ती जबाबदारी हवाई दलाच्या वैमानिकांनी उचलली. लेफ्टनंट जनरल मनोहर लाल चिब्बर, लेफ्टनंट जनरल प्रेम नाथ हुण, मेजर जनरल शिव शर्मा, ब्रिगेडियर विजय चन्ना, कॅप्टन संजय कुलकर्णी अशा अधिकाऱ्यांच्या नियोजन आणि प्रत्यक्ष सहभागातून, असंख्य जवानांच्या बेडर सहभागातून 'ऑपरेशन मेघदूत' ही मोहीम १३ एप्रिल रोजी सुरू होऊन काही दिवसांमध्ये फत्ते झाली.

सियाचीन हिमनदीमध्ये तैनातीची किंमत चुकवावी लागते. आजवर नैसर्गिक प्रकोपामुळे जवळपास ९०० अधिकारी आणि जवानांना प्राणाहुती द्यावी लागली. तरादेखील एक अत्यंत दुर्गम भूभाग झटपट आणि रक्ताचा एक थेंबही न सांडता मोहीम राबवून ताब्यात घेणे कौतुकास्पद खरेच. खुद्द परवेझ मुशर्रफ यांनी कालांतराने या घटनेचे वर्णन 'आम्हाला त्यांनी चकवा दिलाच" या शब्दांमध्ये केले. सियाचीन ही जगातील सर्वांत उंचीवरील युद्धभूमी.तिचे महत्त्व ओळखून कारवाई करण्यासाठी त्या वेळच्या पंतप्रधानांना कितपत फुरसत होती हे कळायला मार्ग नाही. कारण खलिस्तान चळवळ विक्राळ बनली होती आणि तिचा बीमोड करण्यासाठी इंदिरा गांधी यांचे राजकीय नेतृत्व पणाला लागले होते. त्या अस्थिर परिस्थितीत एक अत्यंत महत्त्वाची मोहीम भारताने यशस्वीपणे राबवली. त्याविषयी फार वाच्यताही केली नाही. स्वातंत्र्यानंतर भारताने केलेली ही एकमेव स्वयंस्फूर्त भूभाग अधिग्रहण कारवाई. कारगिल आणि डोकलाम गाफीलपणाच्या पार्श्वभूमीवर ते यश अधिकच झळाळणारे. अशा मोहिमा गाजावाजा न करता जिंकायच्या असतात, मिरवायच्या नसतात. सियाचीनच्या 'मेघदूता'चा हाच सांगावा!


# सुनो द्रौपदी, शस्त्र उठा लो..

आजपासून मतदान सुरू होत असलेल्या यंदाच्या या निवडणुकीचा मुद्दा काय, असा प्रश्न सर्वसामान्य, किमान विचारी जनांस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आव्हान काळातील वर्तनातून व्यक्तीचा खरा स्वभाव दिसून येतो असे म्हणतात. सद्य:स्थितीत निवडणुका हे एक आव्हान. तेव्हा त्यास सामोरे जाणाऱ्या व्यक्तींचे वर्तन पाहिल्यास त्या सर्वांचे अंतरंग, त्यांचा स्वभाव आदींचे 'खरे" दर्शन घडते असे म्हणता येईल. या आव्हानवीरांतील कोणी महिला प्रतिस्पर्ध्याविषयी अत्यंत अनुदार उद्गार काढतो. कोणी स्वपक्षीय पुरुष नेत्याचे कोणा महिलेशी कसे संबंध आहेत याच्या सर्वसामान्यांस काहीही देणेघेणे नसलेल्या मुद्दयांवर बोलतो. एखादा आपला प्रतिस्पर्धी वर्षांच्या कोणत्या कालात शाकाहार/मांसाहार भक्षण करतो यावर टीका करतो. शिक्षणनगरीतील कोणी विद्वान आपल्या आव्हानवीराच्या शैक्षणिक कारकीर्दीविषयी स्वत: जणू आईन्स्टाईन असल्यागत टीका करतो. कोणी कोणास बांगडया पाठवण्याचे कालबाह्य, अत्यंत प्रतिगामी असे रूपक उदाहरणार्थ वापरतो तर अन्य कोणास मुलींचा घटता जन्मदर पाहून भविष्यात अनेकींस पांचाली व्हावे लागेल अशी चिंता वाटते. 'लोकशाहीची जननी" वगैरे असलेल्या या देशातील 'सर्वात मोठया उत्सवात" सहभागी होणाऱ्यांचे शब्दप्रयोगही पाहा. 'युद्ध", 'दाणादाण", 'साफ करून टाकणे", 'धडा शिकवणे", 'अद्दल घडवणे" इत्यादी. यातील ताजी भर म्हणजे मतदान यंत्रांची बटणे कचाकचा दाबा, हा सल्ला. याच नव्हे तर कोणत्याही यंत्राची बटणे दाबण्याची क्रिया ही पटापटा, भराभरा, झपाझप अशी होऊ शकते. कचाकचा हा शब्दप्रयोग भांडणे (सार्वजनिक नळावरची) वा क्रूर, असभ्य, अशिष्ट पद्धतीने चावे घेणे इत्यादी क्रियांशी निगडित आहे असे मराठीचे किमान ज्ञान असलेल्यांस वाटेल. आता ते विसरून बटणे दाबण्याची क्रिया कचाकचा करणे आपणास शिकावे लागणार.

हे सर्व पाहिल्यावर या निवडणुकीचा नक्की मुद्दा काय, असा प्रश्न सर्वसामान्य, किमान विचारी जनांस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा सामान्य माणूस चलनवाढीने होरपळलेला आहे आणि पर्यावरणीय होरपळीला कावलेला आहे. यातील दुसऱ्यासाठी सरकार थेट काही करू शकत नाही याची जाण या विचारी जनांस नक्कीच आहे. पण आताच्या नव्हे तर पुढच्या पिढीसाठी तरी पर्यावरण रक्षणाच्या मुद्दयावर कोण काय करू पाहतो याची चर्चा या निवडणुकांत होताना दिसत नाही. आज विकसित देशांतील निवडणुकांत पर्यावरण हा राजकीय पक्षांच्या कार्यक्रमावरील पहिला मुद्दा असतो. या मुद्दयाचे आपल्याकडील अस्तित्व पाहता विकसितपणाच्या दर्जापासून आपण अद्यापही किती दूर आहोत हे लक्षात यावे. पर्यावरण रक्षण निवडणूक कार्यक्रमात येणे हे फारच झाले. पण निदान चलनवाढ हा मुद्दा चर्चेत असावा, तर तेही नाही. आज भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो आणि हा 'लोकशाहीचा लाभांश" सुरुवातीस अनेकदा साजराही केला गेला. अलीकडच्या काळात हा शब्दप्रयोग कानावर पडत नाही, हे खरे. पण म्हणून तरुणांसमोरील समस्या मिटल्या आहेत असे नाही. अमेरिकेत दर आठवडयात किती रोजगार निर्माण झाले, त्याची अधिकृत आकडेवारी प्रसृत होते आणि हे रोजगार निर्मितीचे प्रमाण घसरले म्हणून आकडेवारी जाहीरच करायची नाही, असे तिकडे होत नाही. या धर्तीवर आपल्याकडेही आठवडयाची जमत नसेल तर नाही, पण महिन्याची/दोन महिन्याची रोजगार निर्मिती किती याचा काही तपशील जाहीर व्हायला हवा, ही अपेक्षा चुकीची नाही. नंदन निलेकणी यांच्या बुद्धिमान कल्पनेतून आकारास आलेला 'आधार क्रमांक" हा आपल्या देशात अपरिहार्य आहे. हा आधार क्रमांक, खासगी/सरकारी संस्थांकडील कर्मचारी तपशील इत्यादी माहिती या 'डिजिटल इंडिया"त नियमितपणे प्रसिद्ध करता येणे अवघड नाही. अर्थात कोणतीही माहिती जाहीर करायचीच नाही, असा काही निर्णय असल्यास गोष्ट वेगळी ! पण तसे काही ठरवले असेल यावर विश्वास का ठेवावा ? सरकार म्हणते त्या प्रमाणे आपली आर्थिक प्रगती निश्चितच होत असणार. आणि जेव्हा आर्थिक प्रगती होत असते तेव्हा रोजगार निर्मितीचा वेगही वाढलेला असतो. त्यामुळे तो आपल्याकडेही वाढलेला असणार, असे गृहीत न धरणे अयोग्य. सरकारने तेव्हढी रोजगार निर्मितीची माहिती ठरावीक अंतराने प्रसृत करावी इतकाच काय तो मुद्दा. तसे झाले असते तर विरोधकांच्या प्रचारातील हवाच गेली असती. त्यासाठी तरी अशी माहिती देण्याची गरज सत्ताधीशांस वाटेल.

एका बाजूने हे सत्ताधीश अशा सकारात्मक निवडणूक कार्यक्रम निर्मितीकडे दुर्लक्ष करत असताना दुसरीकडे विरोधकही तितकेच चाचपडताना दिसतात. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात राणा भीमदेवी गर्जना करून विरोधकांची 'इंडिया" आघाडी जन्माला तर आली. पण अजूनही ती उठून चालू लागलेली आहे, असे म्हणावे अशी स्थिती नाही. अनेक ठिकाणी उमेदवारच नाहीत, सापडले असले तर त्याबाबत विरोधकांची एकवाक्यता नाही. सापडले नसले तर ते शोधायचे कोणी यावर मतभेद. ते मिटणार कधी आणि एकवाक्यता येणार कधी हा प्रश्न ! तो पडतो याचे कारण आज निवडणुकीच्या पहिल्या फेरीचे मतदान होत असताना या विरोधी 'इंडिया" आघाडीची एकही संयुक्त सभा नाही. निदान महाराष्ट्रात तरी या एकीचे दर्शन राज्यातील जनतेस अद्याप झालेले नाही. ही एकत्र सभा भले जमली नसेल. पण निदान किमान समान कार्यक्रम तरी या विरोधकांनी द्यावा ! पण तेही झालेले नाही. तरीही विरोधक एकत्र आहेत असे जनतेने मात्र मानावे आणि त्यानुसार मतदान करावे, अशी या आघाडीच्या नेत्यांची इच्छा. ती पूर्ण करायची मतदारांची इच्छा असली तरी त्या इच्छेस काही आधार तर हवा !



तेव्हा या अशा मुद्देशून्य निवडणुकांत भरीव काही धसास लागण्याऐवजी परस्परांतील बेजबाबदारपणालाच बहर येणार, हे उघड आहे. शिवसेनेचे संजय राऊत आणि राष्ट्रवादीचे अजितदादा पवार यांची ताजी वक्तव्ये ही त्याची निदर्शक. हे उल्लेख केवळ प्रतीकात्मक. राऊत यांचे विधान सत्ताधारी पक्षाच्या एका महिला उमेदवारास उद्देशून होते तर अजितदादांचे लक्ष्य मात्र असे कोणी एक नव्हते. महाराष्ट्रात मुलींचे जननप्रमाण काही प्रमाणात कमी झालेले आहे. काही वर्षांपूर्वी स्त्रीभ्रूणहत्येचे अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस आले. त्याचा संदर्भ मुलींचे जन्मप्रमाण कमी होण्याशी आहे. अजितदादांस हा मुद्दा अधिक जबाबदारीने व्यक्त करता आला असता. पण तसे न करता त्यांना पाच पतींशी संसार करावा लागलेली द्रौपदी आठवली आणि त्यांनी करू नये ते विधान केले.

पुरुषी अहंकार आणि मानसिकतेचा द्रौपदीइतका केविलवाणा बळी अन्य सापडणे अवघड. तथापि त्या पांचालीच्या अवहेलनेमुळे पुढचे सगळे 'महाभारत" घडले हेही विसरून चालणार नाही. 'त्या" महाभारताचे सर्व संदर्भ एकविसाव्या शतकात अप्रस्तुत ठरतील. पण 'त्या" महाभारताचा आधारच घ्यायचा तर आताच्या लोकशाहीची तुलना 'त्या" महाभारतातील द्रौपदीशी होऊ शकेल. 'त्या" द्रौपदीचा अपमान खुद्द तिच्या पतींकडून झाला. सध्याच्या द्रौपदीची विटंबनाही ज्यांनी तिचा मान ठेवायचा त्यांच्याकडूनच होताना दिसते. 'त्या" द्रौपदीच्या लज्जारक्षणार्थ कृष्ण धावला. नियामक यंत्रणांस लोकशाहीच्या रक्षणकर्त्यां मानले तर 'तेव्हाच्या" कृष्णाप्रमाणे हे आताचे नियामक द्वारकेश मदतीस धावतील याची खात्री नाही. अशा वेळी पुष्यमित्र उपाध्याय यांच्या एका कवितेचे स्मरण समयोचित ठरेल. तीत ते द्रौपदीस म्हणतात..

स्वयं जो लज्जा हीन पडे है
वो क्या लाज बचायेंगे
सुनो द्रौपदी शस्त्र उठा लो

अब गोविंद ना आएंगे.. लोकशाही द्रौपदीच्या हातातील शस्त्र म्हणजे मतपत्रिका. त्या शस्त्रोपयोगाचा आज प्रारंभ. कोणत्याही शस्त्राप्रमाणे 'या" शस्त्राचा वापरही काळजीपूर्वक व्हावा ही अपेक्षा!

# ४ वर्षांच्या लेकराला कडेवर घेत आईने संपवले आयुष्य

**पुणे** : पुण्यातून एक धक्कादायक घटना घडली आहे. गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलेने तिच्या ४ वर्षांच्या मुलासह इमारतीच्या ९ व्या मजल्यावरुन उडी मारून आत्महत्या केली आहे. शनिवारी पहाटे ५ च्या सुमारास ही घटना घडली असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वाकड येथील रीगालिया या उच्चभ्रू सोसायटीत ही घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला ही स्क्रिझोफेनिया या आजाराने ग्रस्त होती. कोमल आवटे असं या महिलेचे नाव असून ती तिच्या ४ वर्षांच्या मुलासह राहत होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोमल यांनी इमारतीतून उडी मारताना चार वर्षांचा मुलगा विहान याला कडेवर घेत उडी मारली होती. या घटनेत दोघांचाही जागीच मृत्यू झाला आहे. पोलिसांनी या प्रकरणी वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आमदार जितेंद्र आव्हाड बिष्णोई गँगच्या टार्गेटवर

**क्राईम**



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना धमकीचा फोन आलाय. बिष्णोई गँगने फोनवरुन धमकी दिल्याची माहिती जितेंद्र आव्हाड यानी दिली आहे. रोहित गोदरा नावाच्या व्यक्तीने जितेंद्र आव्हान यांना फोन केला आणि जितेंद्र आव्हाड यांच्याकडे पैशांची मागणी केली. रोहित गोदरा हा लॉरेन्स बिष्णोई गँगचा असल्याची माहिती आहे. पैसे दिले नाही तर तयार राहा असा इशारा धमकी देणाऱ्याने दिल्याचंही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. धमकीचा फोन ऑस्ट्रेलियावरुन आल्याची माहिती आहे.

बिष्णोई गँगच्या रडारवर राजकीय नेते - काही दिवासंपूर्वीच बिष्णोई गँगने अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार केला होता. याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना गुजरातमधून अटक केली आहे. हे प्रकरण ताजं असतानाच आता बिष्णोई गँगने आमदार जितेद्र आव्हान यांना धमकीचा फोन केलाय. यामुळे बिष्णोई गँगच्या रडारवर महाराष्ट्रातील राजकीय नेते आहेत का अशी भीती व्यक्त केली जात आहे. धमकी देणाऱ्या व्यक्तीने पैसे दिले नाहीत तर सलमान-सारखं होईल असं म्हटल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. याप्रकरणी जितेंद्र आव्हाडांकडून पोलीस ठाण्यात तक्रार दिली जाणार आहे. यानिमित्ताने बिष्णोई गँग महाराष्ट्रात सक्रिय होतेय का? असंही बोललं जात आहे.

लॉरेन्स बिष्णोई हा कुख्यात गँगस्टर असून सध्या तो तिहार जेलमध्ये बंद आहे. लॉरेन्स बिश्नोईच्या नावावर अनेक गुन्हे दाखल आहेत. इतकंच नाही तर तो तुरुंगातून आपली गँग चालवतोय. तुरुंगाबाहेर ही गँग सध्या गोल्डी बराड आणि त्याचा भाऊ सचिन बिष्णोईचालवतायत. हे दोघंही सध्या कॅनडात लपलेत. याशिवाय ऑस्ट्रीयामधून अनमोल बिष्णोई आणि कॅनडातून विक्रम बराड आर्थिक देवाण-घेवाणाची कामं सांभाळतात. पोलिसांनी दिलेल्या बिष्णोई गँगमध्ये शार्फ शुटर्स, कॅरिअर, सप्लायर, रेकी करणारे, शेल्टर मॅन आणि सोशल मीडिया विंगचे तरुण मोठ्याप्रमाणावर सहभागी आहेत. गेल्या वर्षी झालेल्या पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणात लॉरेन्स बिष्णोई गँगचा सहभाग असल्याचं समोर आलं होतं.

१९९८ मध्ये सलमान खानने काळविटाची शिकार केल्याचं प्रकरण समोर आलं होतं. तेव्हापासून बिश्नोई समाज सलमान खानच्या विरोधात आहेत. त्याच्या चित्रपटांवरही बहिष्कार घातला जातो, इतकंच काय तर त्याची गाणीही या समाजातील लोकं ऐकत नाहीत. हा समाज शांतीप्रिय मानला जात असल्याने त्यांनी सलमानविरुद्ध आजपर्यंत आवाज उठवला नव्हता. पण गुन्हेगारीच्या जगतात लॉरेन्स बिश्नोईचं नाव चर्चेत आलं आणि त्याने थेट सलमानलाच जीवे मारण्याची धमकी दिली.

# ट्रिपल इंजिन महायुती सरकारला मनसेच्या मूळ इंजिनमुळे आणखी गती

## मनसे आमदार- राजू पाटील



डोंबिवली : (निसर्ग चक्र टीम) : आतापर्यंत महाराष्ट्रात शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादीचे महायुतीचे ट्रिपल इंजिनचे सरकार काम करत होते. आता या इंजिनना मनसेचे मूळ इंजिन जोडले गेल्याने या ट्रिपल इंजिन महायुती सरकारला आणखी गती मिळेल आणि वेगवान विकास पाहण्यास मिळेल, असा विश्वास कल्याण ग्रामीणचे मनसेचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी रविवारी डोंबिवलीत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या येथील सावित्रीबाई फुले नाट्यमंदिरातील कार्य अहवाल प्रकाशन समारंभात व्यक्त केला. ट्रिपल इंजिनचे सरकार असले तरी या इंजिनमध्ये खरे इंजिन हे मनसेचे मूळ इंजिन आहे, याची जाणीव ठेवावी असे आमदार राजू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. शिंदे यांच्याकडे पाहत मिश्किल टिपणी केली.

# लाखोंची नोकरी सोडून 'यूपीएससी' ची तयारी!

# यूपीएससी त भारतातून रँक १ आदित्य श्रीवास्तव

**यशोगाथा**

आदित्याची गेल्या वर्षी आयपीएससाठी निवड झाली. तो सध्या आयपीएसचे प्रशिक्षण घेत आहे. गेल्या वर्षी दुसऱ्याच प्रयत्नात तो पात्र ठरला होता. त्याला २२६ रँक मिळाली होती. तिसऱ्या प्रयत्नात पहिली रँक आली.

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा (युपीएससीचा) निकाल जाहीर झाला आला. या निकालामध्ये महाराष्ट्राने डंका वाजवला. राज्यातून ८७ पेक्षा जास्त जणांना यश मिळाले. देशातून आदित्य श्रीवास्तव याने टॉप केले आहे. कानपूरमधून आयआयटी झालेला आदित्य कॉर्पोरेट क्षेत्रात रुजू झाला. १५ महिने काम केले. परंतु त्याचे मन कॉर्पोरेट क्षेत्रात रमले नाही. त्याला यूपीएससी परीक्षेचे क्षेत्र खुणावत होते. मग त्याने कॉर्पोरेट क्षेत्राला रामराम करत यूपीएससीची तयारी करण्याचा निर्णय घेतला.

लहाणपणापासून टॉपर आदित्य

लहाणपणापासून टॉपर आदित्य लहाणपणापासून टॉपर रहिला होता. त्याचे प्राथमिक शिक्षण लखनऊमधील सीएमएस शाळेत झाले. या शाळेत बारावीपर्यंत आदित्य टॉपर राहिला. त्याला दहावीत ९७.८ तर बारावीत ९७.५ परसेंट मिळाले. तसेच जेईई मेन्स परीक्षेत त्याला चांगली रँक मिळाली. त्यानंतर आयआयटी कानपूरमध्ये तो दाखल झाला. या ठिकाणी बीटेकमध्ये ९.७ सीजीपीए मिळवले.

अन्लाखोंची नोकरी सोडली

आयआयटीमधून इंजिनिअर झाल्यानंतर आदित्य याने अमेरिकन संस्था गोल्डमन सॅक्समध्ये नोकरी केली. त्या ठिकाणी महिन्याला अडीच लाखांचा पगार त्याला होतो. परंतु त्याचे मन त्या नोकरीत रमले नाही. त्याने यूपीएससी परीक्षेची तयारी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्याने कठोर मेहनत केली. यूपीएससीसाठी ऑप्शनल विषय म्हणून इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग इंजिनिअरिंगची निवड केली. त्याची मेहनत यशस्वी ठरली. २०२३ परीक्षेत तो टॉपर आला. आई गृहिणी, काका आयएएस प्रशिक्षण केंद्राचे संचालक आदित्याची गेल्या वर्षी आयपीएससाठी




निवड झाली. तो सध्या आयपीएसचे प्रशिक्षण घेत आहे. गेल्या वर्षी दुसऱ्याच प्रयत्नात तो पात्र ठरला होता. त्याला २२६ रँक मिळाली होती. तिसऱ्या प्रयत्नात पहिली रँक आली. आदित्यची आई गृहणी आहे. त्याचे वडील अजय श्रीवास्तव सेंट्रल ऑडिट डिपार्टमेंटमध्ये AAO आहेत. त्याचे काका विनोदकुमार मसुरी आयएएस प्रशिक्षण केंद्राचे संचालक आहे.

मुख्य कार्यालय : आई द्रौपदा बिल्डिंग, ३०४, शंकेश्वर पाम्सजवळ, साई बाळाराम कॉम्प्लेक्स समोर, खंडोबा मंदीर रोड, डोंबिवली (प.) ता.कल्याण जि. ठाणे - ४२१२०२
मोबा. ९६१९६३००३५ / ९९८७४९६१३६

# श्रीकांत डॉक्टर पण मी अनेकांच्या सर्जरी केल्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे...




–संकलन–
**राजेंद्र श्रावण वखरे**
(वृत्त संपादक)
निसर्ग चक्र

**पान नं. १ वरुन...** राज ठाकरे यांच्याकडून सहकार्य मागणे याच्यात काय लाज वाटली पाहिजे ?असा प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. आम्ही केंद्रात दिल्लीत लोटांगण घालायला जात नाही तर राज्याच्या विकासासाठी आवश्यक काम करायला जातो असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना नाव न घेता टोला लगावला. श्रीकांत शिंदे यांच्या कार्य अहवालाविषयी बोलताना शिंदे भावनिक झाले. मी आज आपल्यासमोर एक ट्रिपल रोलमध्ये आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचा मुख्य नेता, मी या राज्याचा मुख्यमंत्री आहे आणि तुमच्या खासदाराचा पिता म्हणूनदेखील आपल्यासमोर आहे. त्याची गाडी राइट ट्रॅक आणि फुल स्पीडवर आहे. तो एक संसदत्न आहे. या सगळ्याचा मला अभिमान आहे.. दहा वर्षांचा पूर्वीचा आणि आत्ताचा श्रीकांत यामध्ये खूप फरक आहे. पहिली निवडणूक लढवून पाच वर्षांत कामाच्या माध्यमातून त्याने स्वत:ची ओळख निर्माण केली. जाणीव आणि जबाबदारी असलेला लोकप्रतिनिधी म्हणून त्याच्याकडे पाहायला समाधान वाटतं,ठ असं कौतुक मुख्यमंत्री शिंदे यांनी केलं.मनसेच्या पाठिंब्यावर एकनाथ शिंदे म्हणाले, ठविकासाच्या मुद्द्यावर राज ठाकरे नेहमी सांगत असतात. माझ्याकडे येत असतात. सर्वसामान्य लोकांना न्याय हे आपलं सरकार देईल हा विश्वास त्यांच्या मनामध्ये आहे.केंद्रातले मोदी सरकार या देशाला विकासाकडे नेत आहे म्हणून राज ठाकरे, रिपाइं, आरपीआय, आठवले गट, जानकर असे अनेक लोक आपल्याबरोबर आहेत. ही निवडणूकदेखील आपण विकासाच्या मुद्द्यावर लढणार आहोत.डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे चीज केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण गेल्या दहा वर्षापासून शिवसेना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जी मेहनत केली त्या मेहनतीचे कल्याण लोकसभेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी चीज केले. सुरुवातीला एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र अशी त्यांची ओळख होती मात्र त्यांनी आपल्या कामातून स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केल्याची कौतुकाची थाप सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी यावेळी दिली. कल्याण लोकसभा मतदारसंघात मध्यमवर्गीय कुटुंब सर्वाधिक आहेत कार्यकर्त्यांबरोबरच नागरिकांच्या सर्व समस्या त्यांनी जाणून घेऊन इथल्या इन्फ्रास्ट्रक्चर मध्ये नक्की काय केले पाहिजे त्या कामाचा धडाका लावल्यामुळे तुमच्या आणि आमच्या सर्वांची जबाबदारी ही फार वाढल्याचेही ते म्हणाले.

# उघड्यावरील व्यायाम शाळेच्या साहित्यांची तुटफुट दुरुस्तीची मागणी

कल्याण (निसर्ग चक्र टीम) : - कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिसरात मोठा गाजावाजा करून विविध ठिकाणी तरुणांसाठी व सकाळी वॉकिंग साठी जाणाऱ्या साठी उघड्यावर व्यायाम करण्यासाठी साहित्य बसविण्यात आले परंतु एकदा बसवल्यानंतर त्यांच्याकडे कल्याण डोंबिवली महान गरपालिकेने फिरून बघितले नाही असे जनतेच्या चर्चेतून समजते. विविध नाना नानी पार्कमध्ये बसवलेले साहित्य अक्षरश: गंजले असून तुट लेलेही आहे.

त्यामुळे मॉर्निंग सायंकाळ वॉक साठी जाणाऱ्यांची मोठी पंचायत होत आहे म्हणून तातडीने महानगरपालिकेने कल्याण डोंबिवली शहरातील ज्या ज्या ठिकाणी उघड्यावर व्यायाम शाळेचे साहित्य वस्तू बसविल्या आहेत त्याची देखभाल करून दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकातून मोठ्या प्रमाणात होत आहे.

# मसाल्यांमुळे होऊ शकतो कॅन्सर? चार मसाल्यांची विक्री थांबवण्याचा आदेश!

आपण रोज अनेक मसाले खातो. पण हाँगकाँग आणि सिंगापूरमध्ये एकूण चार मसाल्यांची विक्री थांबवण्यात आली आहे.

वेगवेगळ्या मसल्याचे पदार्थ आपण मोठ्या चवीने खातो. मात्र हेच मसाले आपल्यासाठी जीवघेणेदेखील ठरू शकतात. सध्या भारतातील मसाले निर्मिती करणाऱ्या दोन कंपन्यांच्या काही उत्पादनांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कारण हाँगकाँग आणि सिंगापूरच्या सरकारने यातील एका कंपनीच्या तीन आणि दुसऱ्या कंपनीच्या एका मसाल्याची विक्री थांबवली आहे. तसेच तेथील नागरिकांसाठी या सरकारने काही सूचनादेखील जारी केल्या आहेत. हाँगकाँग आणि सिंगापूर सरकारच्या या निर्णयामागचं नेमकं कारण काय आहे? असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

कॅन्सर होण्याचा धोका?

हाँगकाँग आणि सिंगापूर सरकारने भारतातील मसाले निर्मिती करणाऱ्या दोन कंपन्यांच्या उत्पादनांची विक्री थांबवण्यात आली आहे. लोकांनी हे मसाले वापरू नयेत, असं येथील सरकारने म्हटलंय. तेथील खाद्य संरक्षण मंडळाच्या म्हणण्यानुसार या दोनपैकी एका कंपनीच्या तीन आणि दुसऱ्या कंपनीच्या एका मसाल्यात इथिलीन ऑक्साइड नावाचा घटक प्रमाणापेक्षा अधिक आहे. या घटकामुळे कर्करोग होण्याचा धोका असतो. इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरने इथिलीन ऑक्साइड



या घटकाला कर्करोगास कारणीभूत ठरणाऱ्या 'समूह १ कार्सिनोजेन' यामध्ये वर्गीकृत केलेले आहे.

कोणकोणत्या मसाल्यांवर बंदी

वृत्तसंस्था आयएनएएसच्या वृत्तानुसार हाँगकाँगचे खाद्य सुरक्षा मंडळ सेंटर फॉर फूड सेफ्टीच्या (सीएफएस) म्हणण्यानुसार करी पावडर, सांबर मसाला आणि करी पावडर, मिक्स मसाला पावडर, फिश करी मसाले यांची विक्री थांबवण्यात आली आहे.


या मसाल्यांत कीटनाशक, इथिलीन ऑक्साइड आढळले आहे. तपासणीत झाला खुलासा

सेंटर फॉर फूड सेफ्टीनुसार त्यांनी या कंपन्यांच्या वेगवेगळ्या मसाल्यांची नियमित चाचणी केली. त्यासाठी हाँगकाँगमधील तीन दुकानदारांकडून या मसाल्यांचे नमुने घेण्यात आले. याच नमुन्यांत कीटनाशक, इथिलीन ऑक्साइड असल्याचे आढळले. त्यानंतर सेंटर फॉर फूड सेफ्टीने विक्रेत्यांना या मसल्याची विक्री थांबवण्याचा आदेश दिला.

फिश करी मसाल्यावरही कारवाई

एकीकडे हाँकगाँगमध्ये तीन मसाल्यांवर कारवाई करण्यात आली. तर दुसरीकडे सिंगापूरमध्येही दुसऱ्या एका मसाल्याची विक्री थांबवण्याचा आदेश देण्यात आला. सिंगापूरच्या खाद्य सुरक्षा (एसएफए) प्राधिकरणाने या उत्पादनांत इथिलीन ऑक्साईडचे प्रमाण निश्चित प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे म्हटले आहे. एसएफएच्या म्हणण्यानुसार इथिलीन ऑक्साईडचे प्रमाण कमी असलेल्या पदार्थांचे सेवन केल्यावर शरीरावर प्रतिकूल परिणाम होत नाही. पण या घटकाचा समावेश असलेल्या पदार्थांचे बऱ्याच काळापासून सेवन केल्यास त्याचा शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लोकांनी योग्य ती काळजी घेतली पाहिजे, असे सांगितले जात आहे.

# जल प्रदूषण




कल्याण (निसर्ग चक्र टीम) : - ही सर्व जगाला भेडसावणारी पर्यावरणीय गंभीर समस्या आहे. जल प्रदूषणामुळे पाण्यात विशिष्ट गुणधर्मांचे पदार्थ अशा प्रमाणात मिसळले जातात की, त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होऊन ते वापरण्यास अयोग्य ठरते. जल प्रदूषणामुळे सजीवांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात किंवा पाण्याची चव बिघडते, ते घाणेरडे दिसते वा दुर्गंधीयुक्त होते. मानवी कृती आणि अन्य कारणांमुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे बदल होतात आणि पाणी कोणत्याही कारणासाठी वापरण्यास अयोग्य ठरते. या पाण्याला प्रदूषित जल म्हणतात. पाण्याचे प्राकृतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म बदलल्याने मानव व जलीय सजीवांवर अपायकारक परिणाम करणारी जल प्रदूषण ही प्रक्रिया आहे.

नैसर्गिक पाण्यात एखादा बाह्य पदार्थ अथवा उष्णता यांची भर पडल्यास ते पाणी प्रदूषित होऊन त्याचा मानव, इतर प्राणी आणि जलीय जीव यांना अपाय होतो. जगातील बहुतेक देशांत जल प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. कॅनडा, चीन, भारत, जपान, रशिया, अमेरिका इ. देशांत ही समस्या तीव्रतेने जाणवते

पाण्यातील प्रदूषकांचे स्रोत पुढीलप्रमाणे आहेत :

(१) मानवी मलमूत्र व औदयोगिक कार्बनी अपशिष्ट : मानवी वस्त्यांमधून उत्सर्जित झालेले मलमूत्र आणि औदयोगिक अपशिष्टातील कार्बनी पदार्थ मलवाहिन्यांतून नदी, समुद्र किंवा इतर जलाशयांत टाकले जातात. पाण्यात अतिप्रमाणात कार्बनी पदार्थ असल्यास सूक्ष्मजीवांची ऑक्सिजनाची मागणी वाढते. परंतु पाण्यातील ऑक्सिजनाची उपलब्धता घटते. त्यामुळे पारिस्थितिकीय संतुलन बिघडते व प्रदूषकांची समस्या निर्माण होते. विविध कारखान्यांमधून कार्बनी अपशिष्टे पाण्यात सोडल्यामुळे, या अपशिष्टांमार्फत ऑक्सिजन शोषून घेतला जातो. त्यामुळे जल प्रदूषणाची तीव्रता वाढते सांडपाणी व मैला वाहून नेणाऱ्या वाहिन्यांमध्ये रोगांचे सूक्ष्मजीव असतात. अशा पाण्यावर संस्करण केल्यास काही सूक्ष्मजीवांचा नाश होतो, तर काही जिवंत राहतात. असे पाणी इतर जलाशयांत मिसळल्यास ते पाणी प्रदूषित होते. मैलापाण्याची सोय नीट न लावल्यास, त्यामुळे प्रदूषित झालेल्या पाण्याच्या वापरामुळे जठर आणि आतड्याचे रोग संभवतात.

(२) रासायनिक खते : शेतीपासून अधिक उत्पन्न व्हावे, यासाठी शेतजमिनीत रासायनिक खतांचा उपयोग केला जातो. ही खते जोराचा पाऊस पडल्यास ओहोळ, जलप्रवाह यांतून नद्यांना व परिणामी समुद्राला मिळतात. पाण्यातून वाहून आलेल्या या रासायनिक खतांमुळेही जल प्रदूषण होते. जमिनीवरील रासायनिक खते द्रवाच्या रूपात पाझरून भूजलसाठ्यात मिसळून भूजल प्रदूषित होते.

काही वेळा रासायनिक खतातील उर्वरित भागाचा उपयोग शैवालांच्या पोषणासाठी होतो. त्यामुळे शैवालांची वाढ जलद व दाट होते. मात्र, इतर वनस्पतींची वाढ खुंटते. तसेच माशांना धोका पोहोचतो. कालांतराने इष्ट प्रमाणात पोषकद्रव्ये न मिळाल्यास शैवालांचा लवकरच नाश होतो. ही मृत शैवाले कुजतात व अनेक प्रकारचे सूक्ष्मजीव त्यांवर वाढतात. ते पाण्यातील ऑक्सिजन शोषून घेतात. या कुजलेल्या शैवालांमुळे पाण्याला दुर्गंधी सुटते.

> जल प्रदूषणावरील उपाय
> ! जलशुद्धीकरण करणे.
> ! सांडपाणी व मैला पाण्यात सोडण्यापूर्वी विशेष प्रक्रिया करणे.
> जल प्रदूषण
> ! पिण्याच्या पाण्याचे नियमित परीक्षण करणे.
> ! पाण्यातील रोगकारक जीवाणूंच्या संख्येत वाढ होणार नाही, यावर नियंत्रण ठेवणे.
> ! कवकनाशके, कीटकनाशके व कीडनाशके यांचा वापर मर्यादित करणे अथवा टाळणे.
> ! कृत्रिम खतांचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे.
> ! पिण्याच्या पाण्यातील रसायनांच्या प्रमाणाची विशिष्ट मर्यादा असते. या सहज मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात रसायनांची वाढ होऊ नये, यासाठी योग्य ती दक्षता घेणे.
> ! किरणोत्सारी अपशिष्टे विशिष्ट जागी बंदिस्त करून ठेवण्याच्या पद्धतीचा अवलंब करणे.
> ! औष्णिक जल प्रदूषणामूळे जलाशय किंवा समुद्रातील पाण्याचे तापमान २० से.पेक्षा अधिक वाढणार नाही, याची खबरदारी घेणे.
> ! खनिज तेलामुळे होणाऱ्या जल प्रदूषण समस्येवर उपाययोजना आखणे.

(३) कार्बनी रसायने : आधुनिक शेतीमध्ये कीटकनाशके, कवकनाशके, तणनाशके इ. रसायनांचा वापर केला जातो. त्यामध्ये विषारी द्रव्ये असतात. त्यांचा अल्पांश पिण्याच्या पाण्यात मिसळल्यास जल प्रदूषणाचा धोका निर्माण होतो.

(४) खनिज द्रव्ये व रासायनिक अपशिष्टये : कारखान्यातून बाहेर पडलेले अपशिष्ट पदार्थ जलाशयात सोडल्यास त्यातील पाणी प्रदूषित होते. कॅल्शियम व मॅग्नेशियम यांचे क्षार पाण्यात विरघळल्यास ते पाणी कठीण बनते. अशा पाण्याचा उदयोगासाठी व पिण्यासाठी उपयोग होत नाही. औदयोगिक अपशिष्टातील विषारी रसायने पाण्यात मिसळल्यास त्या जलाशयातील जैविक क्रियांमध्ये बदल घडून येतात. काही रसायनांच्या प्रभावाने ते पाणी आम्लीय होते. अशा पाण्यामुळे जलाशयातील सजीवांचा नाश होतो. भारतात चर्म, कागद, लगदा, वस्त्र, रसायने इ. उदयोग जल प्रदूषणास कारणीभूत आहेत.

(५) सांडपाण्यातील व पाणलोटातील गाळ : त्याज्य पाण्यातील गाळामुळे जलाशय गढूळ होतात. गाळाचे थर जमा होऊन कधीकधी जलाशय गाळाने भरून जातात. जलप्रवाहास गाळाचा अडथळा होऊन मैलापाणी व सांडपाणी कोंडले जाऊन चिकट गाळ खाली बसतो. त्यात विनॉक्सिजीवी सूक्ष्मजीव निर्माण होतात. त्यामुळे काही अंशी गाळाचे अपघटन होते. मात्र, ऑक्सिजन मोठ्या प्रमाणात खर्ची पडतो व हवेतील कार्बन डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढते. विनॉक्सिजीवी सूक्ष्मजीवांमुळे हायड्रोजन सल्फाइड हा वायू पाण्यात मिसळतो. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरते.

(६) किरणोत्सारी पदार्थ : किरणोत्सारी अपशिष्टांची विल्हेवाट लावण्यासाठी ती जलप्रवाहाच्या मदतीने विरल करून विखुरली जातात. ही अपशिष्टे जलप्रवाह किंवा समुद्रात मिसळल्यास तेथील पाणी प्रदूषित होते.

(७) उष्णता : पाण्याचे निक्षरीकारक संयंत्रे, औष्णिक विद्युत्‌निर्मिती, रासायनिक व पोलाद कारखाने, अणुकेंद्रीय संयंत्रे अशा अधिक प्रमाणात पाण्याची गरज असणाऱ्या आस्थापनांतून बाहेर पडणारे पाणी अतिउष्ण असते. हे पाणी इतर जलाशयांत सोडल्यास ‘औष्णिक प्रदूषण“ होते. अशा अनैसर्गिक उष्णतेमुळे तेथील पाण्यातील सजीवांच्या जीवनचक्रास बाधा येते व परिसंस्थेचे संतुलन बिघडते.

(८) खनिजे व ज्वालाग्राही तेल : कधीकधी समुद्रपृष्ठावर अपघात घडून येतात. त्यामुळे जलप्रदूषण होते. खनिजे व ज्वालाग्राही तेलाची वाहतूक बहुधा जहाजांतून होत असते. त्यांतील तेलाच्या टाक्या फुटून तेल समुद्रावर पसरते. अशा पाण्यामुळे पक्षी, मासे व इतर जलचर तसेच पाणवनस्पती मृत्युमुखी पडतात. सागरी संसाधनांचा ऱ्हास होतो. समुद्रकिनाऱ्यावरील खनिज तेल परिष्करण कारखान्यांतून, विहिरींतून व साठवण टाकीतून काही प्रमाणात गळत राहते व पाझरत राहते. हे तेलही समुद्राच्या पाण्यात मिसळल्यास जल प्रदूषण होते. अशा दुर्घटनांमुळे माशांना धोका निर्माण होतो. तेल परिष्करण कारखान्याच्या परिसरात जलीय कवचधारी जीवांची निपज होऊ शकत नाही. साठवणीच्या टाक्या स्वच्छ करताना त्यांतील खनिज तेल, पेट्रोल, केरोसीन, डांबर इ. पदार्थ पाण्यात मिसळतात व प्रचंड प्रमाणात मासे मरतात. समुद्रपृष्ठावर तेल पसरल्याने त्या पाण्यात सूर्याची किरणे कमी प्रमाणात मिसळतात. त्यामुळे सागरी जल व वातावरण यांच्यातील ऑक्सिजन विनिमय प्रक्रिया मंद होते.

महाराष्ट्रात जल प्रदूषण रोखण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. नदयांतील पाण्याच्या दर्जाचे संनियंत्रण ४८ ठिकाणी नियमितपणे केले जाते. या ४८ पैकी, ३५ ठिकाणी पाण्याचा दर्जा खालावल्याचे आढळले आहे. महाराष्ट्र राज्याने १९९५ मध्ये राष्ट्रीय नदी कृती आराखडा तयार केला असून नागरी व घरगुती सांडपाण्यामुळे होणारे जल प्रदूषण कमी करणे, हा त्यामागील मुख्य उद्देश आहे.

या योजने अंतर्गत सांडपाणी अडवणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे, नदीघाटाचा विकास करणे, कमी खर्चाचे स्वच्छतागृह बांधणे इ. योजना हाती घेण्यात आल्या आहेत. जल प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व राज्यांच्या सहकार्याने राबविणे यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय जल दर्जा मूल्यांकन प्राधिकरण नियुक्त केले आहे.

## डोंबिवलीतील रहिवासी ,प्रवासी धुळीच्या लोटांनी हैराण; पुनर्विकासासाठी इमारत तोडताना नियम धाब्यावर

**डोंबिवली (निसर्ग चक्र टीम) :** डोंबिवली पूर्वेतील स्वामी समर्थ मठ भागातील नांदिवली पंचानंद येथे रविवारी पुनर्विकासासाठी एक इमारत तोडताना ठेकेदाराने धुळ प्रतिबंधक कोणत्याही उपाययोजना न करता शक्तिमान यंत्रांच्या साहाय्याने दिवसभर तोडकाम केल्याने या भागात धुळीचे लोट पसरले होते. परिसरातील रहिवासी, पादचारी, प्रवासी या धुळीने हैराण होते.

विशेष म्हणजे इमारत तोडण्याच्या बाजुला एका खासगी रुग्णालय आहे. या रुग्णालयातील रुग्णांना या धुळीचा प्रचंड त्रास झाल्याच्या तक्रारी आहेत. परिसरातील रहिवाशांच्या घरात धूळ पसरल्याने त्यांना दरवाजे, खिडक्या बसून घरात बसावे लागते. या भागातील रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशांना धुळीचा सामना करत प्रवास करावा लागत होता.

डोंबिवली पूर्वेतील नांदिवली पंचानंद येथे रविवारी पुनर्विकासासाठी एक इमारत तोडताना ठेकेदाराने धुळ प्रतिबंधक कोणत्याही उपाययोजना न करता शक्तिमान यंत्रांच्या साहाय्याने दिवसभर तोडकाम केल्याने या भागात धुळीचे लोट पसरले होते. परिसरातील रहिवासी, पादचारी, प्रवासी या धुळीने हैराण होते.

मुंबई उच्च न्यायालयाने हवेतील धुळीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना पालिकांना केल्या आहेत. गेल्या वर्षापासून कल्याण डोंबिवली पालिकेच्या पर्यावरण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी धूळ प्रतिबंधक उपाययोजना न करता इमारत तोडणाऱ्या, धुळीचे प्रदूषण करणाऱ्या अनेक विकासक, ठेकेदारांवर दंडात्मक कारवाया केल्या आहेत.

नांदिवलीत धुळीचे लोट

हे माहिती असुनही डोंबिवली पूर्वेतील नांदिवली पंचानंद येथे नांदिवली लाईफ केअर रुग्णालयाच्या समोर रविवारी सकाळपासून एक इमारत पुनर्विकासासाठी तोडण्याचे काम शक्तिमान यंत्राच्या साहाय्याने ठेकेदाराने सुरू केले होते. हे तोडकाम सुरू करण्यापूर्वी ठेकेदाराने इमारतीच्या चारही बाजुला २५ फूट उंचीचे पत्रे, चारही बाजुने हिरव्या जाळ्या लावून धूळ नियंत्रित करणे, पाडकाम करण्यापूर्वी आणि करताना इमारतीवर टँकरव्दारे पाण्याचे फवारे मारणे ही कर्तव्य पाडकाम करताना संबंधित ठेकेदाराने पार पाडणे आवश्यक होते. ठेकेदाराने यामधील एकही अट पूर्ण केली नाही, असे या भागातील रहिवाशांनी सांगितले.

पाडकाम करण्यापूर्वी या भागातील अनेक रहिवाशांनी ठेकेदाराला धूळ प्रतिबंधक उपाययोजना करण्याची सूचना केली, त्याची दखल ठेकेदाराने घेतली नाही. दिवसभर तोडकाम करून ठेकेदाराने परिसरात धुळीचे प्रदूषण केले, अशा तक्रारी रहिवाशांनी केल्या. हे पाडकाम करणाऱ्या ठेकेदाराने न्यायालयाच्या आदेशाचा आणि पालिका प्रशासनाचे आदेश दुर्लक्षित करून इमारत पाडकाम केल्याने या ठेकेदारावर पालिकेने दंडात्मक कारवाई करून



धूळ प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या शिवाय ठेकेदाराला इमारत बांधकाम तोडण्याची परवानगी देऊ नये, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

नांदिवली पंचानंद भागात एक पुनर्विकासाची इमारत तोडताना धूळ प्रतिबंधक कोणत्याही उपाययोजना न करता रविवारी पाडकाम केले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित ठेकेदाराने नियमांचे उल्लंघन केल्याने त्याच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. – रोहिणी लोकरे, कार्यकारी अभियंता, पर्यावरण विभाग, कडोंमपा.

नांदिवली पंचानंद येथील इमारत तोडणाऱ्या ठेकेदाराने धुळीचे प्रदूषण केल्याने त्यांना नोटीस पाठवून त्यांचे पाडकाम तातडीने थांबविण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

धुळीचे प्रदूषण केल्याने त्यांच्यावर उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. – भारत पवार, साहाय्यक आयुक्त, ई प्रभाग, डोंबिवली.

## लोकसभा निवडणुकीमुळे कल्याण-डोंबिवलीत चोरट्या मद्याची उलाढाल वाढली, ३०० लिटर गावठी आणि विदेशी मद्य जप्त

**डोंबिवली (निसर्ग चक्र टीम) :** डोंबिवलीतील टिळकनगर पोलीस आणि कल्याण लोहमार्ग टिळकनगर पोलीस आणि कल्याण लोहमार्ग पोलिसांनी दोन ठिकाणी छापेमारी करून ३०० लिटरहून अधिक साठ्याची हातभट्टीची नवसागरयुक्त आणि विदेशी मद्य जप्त केले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण, डोंबिवली परिसरात चोरट्या मार्गाने दारूची मोठ्या प्रमाणात उलाढाल वाढली आहे. टिळकनगर पोलीस आणि कल्याण लोहमार्ग पोलिसांनी दोन ठिकाणी छापेमारी करून ३०० लिटरहून अधिक साठ्याची हातभट्टीची नवसागरयुक्त आणि विदेशी मद्य जप्त केले आहे.

निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांचे पदाधिकारी झोपड्पट्टी, चाळी भागात रात्रीच्या वेळेत मद्य वाटून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रकार करतात. अनेक वर्ष हा प्रकार सुरू असल्याने निवडणूक काळात पोलीस यंत्रणा अशा चोरट्या मद्याविषयी अधिक सतर्क असते.

या चोरट्या मद्य विक्रीप्रकरणी कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील माणेरे गावातील मद्य विक्रेता शैलेश भोईर आणि याच गावातील वाहतूकदार संजय जाधव (२०) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. कल्याण लोहमार्ग पोलिसांनी पोलिसांनी टिटवाळा लोकलमध्ये शहाड रेल्वे स्थानकाच्या दरम्यान एका प्रवाशाच्या पिशवीतून चोरून चालविलेल्या २०० विदेशी मद्याच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी लोहमार्ग पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरी कांदे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शहापूर जवळील खडवली भागात राहणाऱ्या नथुराम तांबोळी या इसमा विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांनी सांगितले, रविवारी मध्यरात्री उल्हासनगर जवळील माणेरे गावातून एक इसम गावठी मद्याचे फुगे घेऊन ९० फुटी रस्त्यावरील कचोरे गावात दारू विक्रीसाठी येणार आहे.



ही माहिती हवालदार प्रशांत वानखेडे यांना मिळाली होती. रविवारी मध्यरात्री तातडीने गुन्हे शाखेच्या पथकाने कचोरे गावाजवळील मोहन सृष्टी संकुलाच्या बाहेरील रस्त्यावर सापळा लावला. रात्री एक वाजण्याच्या दरम्यान आरोपी संजय जाधव दुचाकीवर मद्याच्या पिशव्या घेऊन कचोरे गावात वेगाने जात होता. पोलिसांनी त्याला अडविले.

पोलिसांनी त्याची पिशवी उघडली, त्यात गावठी मद्याचा वास आला. पोलिसांनी त्याच्या पिशव्या तपासल्या सर्व पिशव्यांमध्ये फुग्यामध्ये ठेवलेली ३६ हजार रुपये किमतीची १६० लिटर नवसागरयुक्त गावठी दारू आढळली. ही दारू माणेरे गावचे मद्य विक्रेते शैलेश भोईर यांनी आपणास कचोरे येथे विक्री करण्यासाठी पाठविले असल्याची माहिती जाधवने पोलिसांनी दिली. पोलिसांनी दारू नष्ट करून संजय जाधवला अटक केली. त्याच्यावर टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आरोपीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

रेल्वेतून दारू विक्री

निवडणुकीच्या तोंडावर प्रतिबंधित वस्तू लोकलमधून वाहून नेण्यावर करडी नजर पोलिसांनी ठेवली आहे. सीएसएमटी-टिटवाळा लोकलमध्ये एक प्रवासी पिशवीत २०० हून अधिक विदेशी मद्याच्या बाटल्या घेऊन टिटवाळा येथे चालला होता. शहाड रेल्वे स्थानकाच्या दरम्यान गस्तीवरील रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांना संशय आला. त्यांनी संशयित प्रवाशाची पिशवी तपासली. त्यात मद्य बाटल्या आढळल्या. नथुराम तांबोळी असे प्रवाशाचे नाव आहे.

तो खडवली येथील रहिवासी आहे. या मद्याच्या बाटल्या कोठुन आणल्या. त्या कोणाला विकणार होता, याचा तपास लोहमार्ग पोलीस करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शिवम राजेंद्र वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम.आय. डी.सी., ठाणे - बेलापूर रोड ,नवी मुंबई,जि.ठाणे , पिन कोड.नं.४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण , जि. ठाणे , पिन कोड.नं.४२१३०१ येथून प्रकाशित केले.(आर.एन.आय.नं. एम ए एच एम ए आर / २०२२/८३३३८ ) , **Mob. 09987496136**

Printed , Published , Owned & Editor : Shivam Rajendra Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD. , PLOT. No. W-230 , TTC Industrial Area , Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA- 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) **RNI.No. MAHMAR/2022/83338**